**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**

**MAHARASHTRA PUBLIC SERVICE COMMISSION**

बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, महात्मा गांधी मार्ग, हुतात्मा चौक, मुंबई ४००००१ ☎२२६७ ०२१० /१४८/२४८,२२१०२२२२ फॅक्स : २२६७३९१५

Bank of India Bldg, 3rd floor, Mahatma Gandhi Road, Hutatma Chowk, Mumbai 400001 ☎ 2267 0210 /148 /248, 22102222 Fax : 22673915

**ई-मेल - sec_mpsc@maharashtra.gov.in वेबसाईट - www.mpsc.gov.in, www.mpsconline.gov.in**


**धारिका क्रमांक :** १८४४(३)/३/सात.        **जाहिरात क्रमांक : १७०/२०११**

आयोगामार्फत **रोजगार व स्वयंरोजगार विभागातील** खालील पदावरील भरतीसाठी **ऑनलाईन** पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. या पदासाठी अर्हताप्राप्त असलेले उमेदवार अर्ज करू शकतात.

**२. उपलब्ध पदसंख्या** :-

| पदाचे नाव | एकूण पदसंख्या | अराखीव | अ.जाती व त्यातील बौध्द धर्मातरित | अनुसूचित जमाती | वि. जा. (अ) | भ. ज. (ब) | वि. मा. प्र. | भ. ज. (क) | भ. ज. (ड) | इ. मा. व. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन अधिकारी, सामान्य राज्य सेवा, गट-ब, रोजगार व स्वयंरोजगार संचालनालय.** | ३५ | १३+५*+२☑ | ४+२* | १+१* | १+१* | १ | १ | १ | - | २ |
| | **एकूण ३५ पदांपैकी १ पद अपंग अंध व अल्पदृष्टी मधील अंध व अल्पदृष्टी** (Blind / Low Vision) **करीता आणि १ पद कर्णबधिर मधील कर्णबधीर** (Hearing Handicapped) **करीता आरक्षित.** | | | | | | | | | |

(१) सामान्य प्रशासन विभागाचे शासन परिपत्रक क्रमांक अपंग-१००९/प्र.क्र.२७६/०९/१६-अ, दिनांक १९ मार्च, २०१० नुसार अपंग अंध व अल्पदृष्टी प्रवर्गातील उमेदवार ज्या प्रवर्गातील असेल त्या प्रवर्गात त्यास सामावून घेण्यात येईल.

(२) * **महिला उमेदवार उपलब्ध असल्यास,**

(३) ☑ **अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडू.**

(४) वि.जा.(अ), भ.ज.(ब) आणि भ.ज.(क) साठी आरक्षित पदावर योग्य उमेदवार उपलब्ध न झाल्यास सदर पद शासनाच्या अंतर्गत परिवर्तनाच्या धोरणानुसार भरण्यात येईल.

(५) वर नमूद केलेल्या पदसंख्येत व आरक्षणामध्ये शासनाच्या संबंधित विभागाच्या सूचनेनुसार बदल होण्याची शक्यता आहे.

(६) रोजगार व स्वयंरोजगार विभाग शासन निर्णय क्रमांक इएसई-२००४/प्र.क्र.३८/प्र.शा.२, दिनांक ८ नोव्हेंबर, २०१० नुसार अंध/अल्पदृष्टी मधील अंध/अल्पदृष्टी (B/LV), कर्णबधीर मधील (HH), अस्थिव्यंग मधील दोन्ही पायाने अधू/एका हाताने अधू /एका पायाने अधू (BL/OA/OL) प्रवर्गाचे अपंगत्व असलेले उमेदवार प्रस्तुत पदासाठी अर्ज करण्यास पात्र आहेत.

३. **वेतनश्रेणी- रु.** ९,३०० - ३४,८०० + ग्रेड पे **रु.** ४,४००/-, एकूण वित्तलब्धी अंदाजित **रु. २४,०००/-**

४. **पात्रता:- ४.१** भारतीय नागरिक. **४.२ वय:-(१) दिनांक १ एप्रिल, २०१२** रोजी **३०** वर्षे, मागासवर्गीयांसाठी ५ वर्षे शिथिलक्षम. (२) महाराष्ट्र शासनाच्या सेवेतील कर्मचाऱ्यांना उच्च वयोमर्यादा लागू नाही. (३) शासन आदेशानुसार माजी सैनिक, अपंग व खेळाडू इत्यादीसाठी वयोमर्यादा शिथिलक्षम राहील. (४) **असामान्य** अर्हता किंवा **असामान्य** अनुभव किंवा दोन्ही असणा-या उमेदवारांच्या बाबतीत कमाल वयोमर्यादा शिथिल करण्याचा आयोगाकडून विचार करण्यात येईल. **परंतु आयोगाच्या कार्यनियमावलीतील प्रमाणानुसार जेव्हा मुलाखतीसाठी उमेदवार प्राप्त होत नसतील तेव्हाच हा नियम विचारात घेतला जाईल. अशा प्रत्येक प्रकरणी उपलब्ध उमेदवारांच्या उच्चतम शैक्षणिक अर्हतेच्या दोन स्तर उच्च शैक्षणिक अर्हताप्राप्त उमेदवारच वयोमर्यादेत सवलतीकरीता विचारात घेतले जाईल. अनुभवाच्या संदर्भात ज्या पदावरील किमान अनुभव मागितला असेल त्यापेक्षा वरिष्ठ पदावरील अनुभव वयोमर्यादा शिथिलीकरणास्तव विचारात घेतला जाईल. ४.३ शैक्षणिक अर्हता:**- सांविधिक विद्यापीठाची किमान द्वितीय श्रेणीतील पदवी किंवा महाराष्ट्र शासनाने तिच्याशी जाहिर केलेली समतुल्य अर्हता. **आणि तद्नंतर, ४.४ अनुभव :** प्रशासन, वाणिज्य, कामगार कल्याण किंवा कल्याणकारी काम व शैक्षणिक किंवा व्यावसायिक मार्गदर्शन, किंवा रोजगार पणन संशोधन किंवा वाणिज्यिक क्षेत्रात सर्वेक्षण, किंवा सांख्यिकी आकडेवारीचे संकलन व निर्वचन किंवा संगणकीय प्रक्रिया पध्दती मधील विश्लेषण व प्रयुक्तता मधील **पर्यवेक्षकीय क्षमतेच्या** पदावरील किमान **३ वर्षाचा अनुभव** आवश्यक.

**परंतुक-** (१) अर्थशास्त्र, वाणिज्य, संख्याशास्त्र, मानसशास्त्र, शिक्षणशास्त्र, कायदा, कामगार कल्याण किंवा समाज कल्याण या विषयातील किमान व्दितीय श्रेणीतील पदवी धारकास प्राधान्य.

**टीप** - अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब) किंवा भटक्या जमाती (क) यातील उमेदवारांसाठी राखीव असलेली पदे भरण्यासाठी आवश्यक अर्हता किंवा अनुभव असलेले उमेदवार पुरेशा संख्येत उपलब्ध नसल्याचे निवड करण्याच्या कोणत्याही टप्प्यावर आयोगाचे मत झाल्यास, आयोगास अशी निवड करण्याबाबतीत, त्या नियमांमध्ये ठरवून दिलेली आवश्यक अर्हतेची श्रेणी किंवा अनुभवाचा कालावधी (**४०% पर्यन्त** ) किंवा दोन्ही बाबी शिथिल करुन अशा जातीच्या किंवा जमातीच्या योग्य उमेदवाराची निवड करण्याचा विचार करण्यात येतील.

५. प्रस्तुत जाहिरातीमध्ये नमूद केलेली शैक्षणिक अर्हता, अनुभव इत्यादी अर्हता किमान असून किमान अर्हता धारण केली म्हणून उमेदवार मुलाखतीस बोलाविण्याकरीता पात्र असणार नाही. जाहिरातीस अनुसरुन प्राप्त झालेल्या अर्जांची संख्या वाजवी प्रमाणापेक्षा जास्त असेल आणि अर्ज सादर केलेल्या सर्व पात्र उमेदवारांच्या मुलाखती घेणे सोईस्कर नसल्यास मुलाखतीसाठी उमेदवारांची संख्या मर्यादित करण्याच्या दृष्टिने जाहिरातीत दिलेल्या शैक्षणिक अर्हता आणि/अथवा अनुभव यापेक्षा उच्चतम शैक्षणिक अर्हता/अनुभव याच्या आधारे निकष निश्चित करुन अथवा चाळणी परीक्षेद्वारे मुलाखतीस पात्र उमेदवारांची संख्या मर्यादित करण्यात येईल. चाळणी परीक्षा घेण्याचे निश्चित झाल्यास, अर्हता आणि / अथवा अनुभव शिथील केला जाणार नाही. चाळणी परीक्षेचा अभ्यासक्रम, परीक्षेचे माध्यम व इतर बाबी आयोगाच्या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात येईल.

६. **कर्तव्ये व जबाबदाऱ्या** - प्रस्तुत पदाच्या कर्तव्ये व जबाबदा-या याबाबतचा तपशील आयोगाच्या www.mpsc.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

७. प्रस्तुत जाहिरातीमध्ये भरतीसंदर्भातील संक्षिप्त तपशील दिलेला आहे. अर्ज करण्याची पद्धत, आवश्यक अर्हता, आरक्षण, वयोमर्यादा, शुल्क, निवडीची सर्वसाधारण प्रक्रिया, इत्यादीबाबतच्या सविस्तर तपशीलासाठी आयोगाच्या www.mpsc.gov.in या वेबसाईटवरील सरळसेवा भरती अंतर्गत "**उमेदवारांना सर्वसाधारण सूचना** " मध्ये उपलब्ध करुन देण्यात आलेल्या माहितीचे कृपया अवलोकन करावे. आयोगाच्या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात आलेली माहिती व जाहिरात अधिकृत समजण्यात येईल.

८. **शुल्क** : (१) अमागास- **रु. ४१०/-** (२) मागासवर्गीय **रु. २१०/-** (३) सदर शुल्क ऑनलाईन अर्जांची नोंदणी केल्यावर प्राप्त होणा-या विहित चलनाद्वारे भारतीय स्टेट बँकेच्या कोणत्याही शाखेमध्ये चलनावर नमूद केलेल्या अंतिम दिनांकापूर्वी व बँकेच्या कार्यालयीन वेळेत रोखीने भरावे लागेल. (४) आयोगाने विहित केलेल्या चलनाव्दारेच विहित कालावधीत बँकेमध्ये फक्त रोखीने परीक्षा शुल्क भरावे. नेट बँकींग, क्रेडिट कार्ड, डेबिट कार्ड इत्यादीसारख्या माध्यमाव्दारे शुल्क भरता येणार नाही.

९. **अर्ज करण्याची पद्धत** :- (१) प्रस्तुत परीक्षेसाठी अर्ज फक्त ऑनलाईन पद्धतीने स्वीकारण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत. (२) पात्र उमेदवाराला वेब-बेस्ड (Web-based) ऑनलाईन अर्ज www.mpsconline.gov.in या वेबसाईटद्वारे **दिनांक २९ डिसेंबर, २०११ ते दिनांक २७ जानेवारी, २०१२** या कालावधीत सादर करणे आवश्यक राहील. (३) ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सूचना आयोगाच्या www.mpsconline.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. तसेच ऑनलाईन पद्धतीने अर्ज भरण्याचे प्रात्यक्षिक (Demo) सदर वेबसाईटवर पाहता येईल. (४) विहित पद्धतीने अर्ज सादर करुन बँकेमध्ये चलनाव्दारे शुल्क भरल्यावर, दोन कार्यालयीन कामकाजाच्या दिवसानंतर (Working Days) उमेदवाराच्या मोबाईल क्रमांकावर आयोगास रक्कम प्राप्त झाल्याबाबतचा (Transaction ID Updated Successfully) एस.एम.एस. आयोगाकडून पाठविण्यात येईल. तसेच उमेदवाराच्या प्रोफाईलमध्ये Application Status व्दारे रक्कम प्राप्त झाल्याबाबत सूचना प्राप्त होईल. (५) चलनाद्वारे शुल्क भरल्यानंतर बँकेकडून Transaction ID प्राप्त होईल. दोन कार्यालयीन कामकाजाच्या दिवसानंतर आयोगाकडून एस.एम.एस. प्राप्त न झाल्यास अथवा प्रोफाईलद्वारे सूचना प्राप्त न झाल्यास चलनावर उपलब्ध करुन देण्यात आलेल्या Tansaction ID ची नोंद पुन्हा ऑनलाईन पद्धतीने अचूकरित्या करावी. Tansaction ID ची नोंद अचूकरित्या होत नसेल अथवा तांत्रिक अडचण उद्भवत असेल तर ऑनलाईन अर्ज प्रणालीच्या Feedback द्वारे Registration ID, Transaction ID व चलनावरील बँकेत रक्कम भरल्याचा दिनांक आयोगास पाठवावा. बँकेकडून प्राप्त झालेल्या Transaction ID ची नोंद अचूकपणे झाली असल्याबाबत खात्री करण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील. (६) चाळणी परीक्षा घेण्याचे निश्चित झाल्यास चाळणी परीक्षेपूर्वी ७ दिवस अगोदर उमेदवारास प्रवेशप्रमाणपत्र त्याच्या प्रोफाईलद्वारे उपलब्ध करुन देण्यात येईल. त्याची प्रत उमेदवाराने चाळणी परीक्षेपूर्वी डाऊनलोड करुन घेणे व चाळणी परीक्षेच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे. (७) चाळणी परीक्षेच्या वेळी उमेदवाराने प्रवेश प्रमाणपत्र आणणे सक्तीचे आहे. त्याशिवाय चाळणी परीक्षेस प्रवेश दिला जाणार नाही.

१०. **विहित पध्दतीने अर्ज सादर करुन शुल्क भरण्यासाठी चलनाची प्रत घेण्याची कार्यवाही दिनांक २७ जानेवारी, २०१२ रोजी २३.५९ वाजेपर्यंत पूर्ण करणे आवश्यक आहे. त्यानंतर सदर वेबलिंक बंद होईल.**

११. **चलनाद्वारे विहित शुल्क भारतीय स्टेट बँकेमध्ये दिनांक दिनांक २८ जानेवारी, २०१२ रोजी बँकेच्या कार्यालयीन वेळेत भरणे बंधनकारक आहे.**

१२. प्रस्तुत जाहिरात उमेदवारांच्या केवळ माहितीसाठी तंत्रशिक्षण संचालनालयाच्या www.dte.org.in आणि उच्च शिक्षण संचालनालयाच्या www.dirhe.org.in या वेबसाईटवर उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

**मुंबई** :
**दिनांक : २९ डिसेंबर, २०११.**

**नि. श. पटवर्धन**
**उपसचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग.**